# मेट्रोच्या १३व्या बोगद्याचे काम पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई



कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्पातील १३व्या विधानभवन स्थानकाच्या बोगद्याचे खोदकाम शुक्रवारी पूर्ण झाले. सप्टेबर २०१८पासून मेट्रोचे बोगदे खोदण्याचे हे काम सुरू झाले आहे.

२४ सप्टेंबर २०१८ रोजी मरोळ नाका येथे पहिला बोगदा खोदण्यात आला. त्यानंतर डिसेंबर २०१८ मध्ये सीप्झ स्थानक बोगदा पूर्ण झाला. त्यानंतर जानेवारी, फेब्रुवारी, मार्च व एप्रिल २०१९मध्ये अन्य बोगद्यांची कामे पूर्ण झाली. सर्वाधिक चार बोगदे मार्चमध्ये पूर्ण झाले. त्यात सहार स्थानक, एमआयडीसी, वरळी, विद्यानगरी या बोगद्यांचा समावेश होते. त्यानंतर एप्रिलमध्ये डोमेस्टिक विमानतळ, विधानभवन व विद्यानगरी येथील कामे पूर्ण झाली. मार्चपासून या कामाने वेग घेतला आहे. टप्प्याटप्प्याने टीबीएम यंत्राद्वारे ही कामे सुरू आहेत. काही ठिकाणी एकाच दिवशी दोन बोगदे खोदण्याची कामेही झाली आहेत.

दरम्यान, कुलाबा ते सीप्झ मार्गावर प्रकल्पस्थळी १७ टीबीएम यंत्र कार्यरत असून बोगदा खोदणे, त्याचबरोबर आतील भागास काँक्रिटचे अस्तर लावणे ही कामे एकाच वेळी सुरू आहेत.

मिठी नदीखालून मार्ग

या प्रकल्पातील एक बोगदा मिठी नदीखालून जाणार आहे. हे काम अत्यंत आव्हानात्मक आहे. वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स ते धारावी पट्ट्यात मिठी नदीखालच्या बोगद्याचे काम होणार आहे. या कामाला सुरुवात झाली आहे.